# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/६५/६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in
**संकेत-स्थळ** : www.merc.gov.in

जाहिरात क्र. ०९/२०१९-२०

## जाहीर सूचना

**नूतनशील ऊर्जेशी संबंधित महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या तीन प्रारूप विनियमांवर अभिप्राय, सूचना आणि हरकती मागविण्याबाबत..**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने खालील तीन प्रारूप विनियम तयार केले आहेत. प्रस्तावित संबंधित विनियम खाली निर्देशित केल्याप्रमाणे पूर्वीच्या विनियमांना अधिक्रमित करतील :

| अनु. क्र. | प्रारूप मविनिआ विनियम | पूर्वीचे/विद्यमान विनियम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) विनियम २०१९ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरीता नक्त मापन) विनियम, २०१५ |
| २ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चिती-करणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चिती-करणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ |
| ३ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१९ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ |

हे प्रारूप विनियम त्यांवरील चर्चा-पत्रिकांसह www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात ठेवण्यात आले आहेत.

आयोग, वरील प्रारूप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून वरील प्रत्येक किंवा कोणत्याही प्रारूप विनियमांवर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठवावयाच्या असल्यास त्या स्वतंत्रपणे २ (१+१) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्रं. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०००05 येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्रं. ०२२-२२१६३९७६ किंवा ई-मेल - remerc@merc.gov.in द्वारा पाठवाव्यात.

दि. १८ नोव्हेंबर, २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून प्रारूप विनियमांस अंतिम स्वरूप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

**मुंबई,**
**दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१९**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 17**